# सापळा केस

दिनांक ०६/०५/२०२२

**आरोपी लोकसेवक बालासाहेब सुर्यकांतराव अंबोरे, व्यवसाय एमआयएस कॉर्डीनेटर कंत्राटी, गट साधन केंद्र परभणी. रा. वकील कॉलनी परभणी यांनी ३०,०००/— रू लाच स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथे दि. ०२/०५/२०२२ रोजी तक्रार दिली की, त्यांच्या मुलाचे पहिलीचे वर्गात आरटीई अंतर्गत प्रवेश मिळविण्याकरीता त्यांनी ऑनलाईन अर्ज केला होता. त्यावरून त्यांना स्कॉटीश ॲकॅडमी परभणी येथे प्रवेश घेण्यासाठी त्यांचे मोबाईलवर एसएमएस आला होता. तक्रारदार हे त्यांचे मुलाचे आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी स्कॉटीश ॲकॅडमी परभणी येथे गेले असता त्यांचे मुलाचे ॲडमीशनचे काम झाले नाही व त्यांना असे समजले की, गट शिक्षण अधिकारी सर्व शिक्षा अभियान केंद्र परभणी येथे आरटीई प्रवेशाचे अप्रुव्हल देतात. त्यांचे अप्रुव्हल शिवाय प्रवेश निश्चीत होत नाही. म्हणुन ते दि.३०/०४/२०२२ रोजी सदर कार्यालयात अप्रुव्हल करीता गेले असता तेथे ते आरटीई चे काम पाहणारे संबंधीत लिपीक अंबोरे यांना भेटण्यास गेले असता त्याकार्यालयातील श्री. शिंदे यांनी त्यांना दहा ते पंधरा मिनीट थांबवुन लिपीक अंबोरे यांचेकडे पाठवले. तेव्हा श्री.अंबोरे तक्रारदार यांना म्हणाले की, तुमचे आरटीई प्रवेशाचे अप्रुव्हलचे काम होईल पण तुमचे घर पहायला यावे लागेल. त्यावरून श्री.अंबोरे व श्री.शिंदे यांनी तक्रारदार यांचे खानापुर नगर परभणी येथे आले पण घराची पाहणी न करता तुम्ही ऑफीसला या तुम्हाला बोलतो असे सांगीतले. त्यानंतर त्यांनी तक्रारदार यांना आरटीई प्रवेशाचे अप्रुव्हल पाहीजे असेल तर ३००००/— रूपये द्यावे लागतील. वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यावरून लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत नमुद आलोसे बालासाहेब अंबोरे यांनी दिनांक ०६.०५.२०२२ रोजी तक्रारदार यांचे मुलाचे आरटीई अंतर्गत प्रवेशाचे अप्रुव्हल देण्यासाठी ३०,०००/— रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम पाच वाजता घेवुन येण्यास सांगीतले. त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे बालासाहेब अंबोरे यांनी गट साधन केंद्र परभणी कार्यालयात तक्रारदार यांचेकडुन सदर लाचेची रक्कम ३००००/— रूपये पंचासमक्ष स्विकारली आहे. आलोसे बालासाहेब अंबोरे यांना ताब्यात घेतले असुन त्यांचे विरूध्द पो.स्टे.नानलपेठ, परभणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्री.राहुल खाडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद परिक्षेत्र औरंगाबाद अतिरीक्त पदभार नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अपर पोलीस अधिक्षक श्री. धरमसिंग चव्हाण, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस उप अधिक्षक श्री. किरण बिडवे यांचे निरीक्षणात पोलीस निरीक्षक श्री. सदानंद वाघमारे, पोह/ घाग, हनुमंते, निलपत्रेवार, पोना/कटारे, कुलकर्णी, पोशि/कदम, चटटे, धबडगे, मुक्तार, मपोशि /दंडवते चापोना/कदम ,चासपोउपनि/शेख हबीब लाप्रवि परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या कमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी कमांक 02452—220597** Email ID - dyspacbparbhani@gmail.com **टोल फ्री कमांक 1064**

श्री.राहुल खाडे,पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड — 8888807299
श्री.धरमसिंग चव्हाण, अप्पर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड — 9923417076
श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी — 7020224361
श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी — 9823616142
श्री. बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी — 9881141218

Scanned with CamScanner